# गिरनारी

श्री दत्ता गुरुदत्ता अत्रि नंदना
योगी अवधूता सुहास्यवदना
धन्य मी झालो पात्र तुझ्या दर्शना
शक्य ना ते कधी तव कृपेविना
श्री दत्ता गुरुदत्ता

गिरनार नगी सोपे ना पोचणे
दश सहस्र पायऱ्याही चढणे
तरुणाईसही कठीण जमणे
साधले ते वृद्धाला तुझ्या दयेने
श्री दत्ता गुरुदत्ता

– नारायण
०९/२२/२३